आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक २६ मार्च २०२६

ठळक बातम्या

1. देशातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाची स्पष्टोक्ती

2. केंद्र सरकारदवारा महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास मंजुरी; प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन वितरण

3. रामनवमी सणाचा सर्वत्र उत्साह, नागपूरच्या पोद्दारेश्वर राम मंदिरातून पारंपरिक श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेला सुरवात

आणि

4. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य वन विभाग यांच्यात नागपूरच्या जामठा इथं 'मनोरंजन आणि जैवविविधता क्षेत्र' विकसित करण्यासाठी सामंजस्य करार

-------------

इंधन पुरवठा सुरक्षित

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देशातील इंधन आणि एलपीजी पुरवठा पूर्णपणे सुरक्षित आणि नियंत्रणात असल्याचं स्पष्ट केलं आहे. देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा तुटवडा नसून सर्व पेट्रोल पंप सुरळीतपणे सुरू आहेत आणि कुठेही रेशनिंग लागू केलेले नाही. भारत हा जगातील चौथा सर्वात मोठा रिफायनर आणि पाचवा सर्वात मोठा निर्यातदार असून 150 हून अधिक देशांना इंधन पुरवठा करतो, त्यामुळे देशांतर्गत उपलब्धता स्थिर आहे, असं मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे म्हटलं आहे. भारताला 41 पेक्षा अधिक देशांकडून पुरेसा कच्चा तेल पुरवठा मिळत आहे आणि सर्व शुद्धीकरण प्रकल्प 100% पेक्षा जास्त क्षमतेने कार्यरत आहेत. सध्या देशाकडे सुमारे 60 दिवसांचा इंधन साठा उपलब्ध असून पुढील दोन महिन्यांसाठीही खरेदी निश्चित करण्यात आली आहे. एलपीजी उत्पादनात 40% वाढ करून दररोज 50 हजार मेट्रिक टन उत्पादन होत असून उर्वरित गरजेसाठी 800 हजार मेट्रिक टन आयात निश्चित करण्यात आली आहे. दररोज 50 लाख सिलिंडर वितरित होत असून सध्या मागणी सामान्य पातळीवर आली आहे.सोशल मीडियावर पसरवल्या

जाणाऱ्या अफवा आणि चुकीच्या माहितीपासून नागरिकांनी दूर राहावं , असं आवाहन करत अशा अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही सरकारनं दिला आहे.

## इंधन शुल्क

हॉटेलं तसंच खानपान-गृहांसारख्या आस्थापनांनी एलपीजी गॅस किंवा इंधन शुल्क या नावाखाली कोणतंही अतिरिक्त शुल्क आकारू नये असा इशारा केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने दिला आहे. अशा शुल्क आकारणीची तक्रार १९१५ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनच्या मोबाईल अ‍ॅपवर करता येईल. जिल्हाधिकारी किंवा थेट प्राधिकरणाकडेही याची तक्रार करता येईल अशी माहिती प्राधिकरणाने दिली आहे.

## केरोसीन

आखाती देशांतील युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत राज्य सरकारने पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणास गती देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये तिन्ही सरकारी तेलकंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. केरोसीनचे दर राज्य सरकारकडून स्वतंत्रपणे जारी केले जाणार आहेत. अन्न, नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात सोडण्याचे आदेश राज्य सरकारचे जारी केले आहेत.

## रामनवमी शुभेच्छा

आज चैत्र शुद्ध नवमी अर्थात श्रीराम नवमी. देशभरात आज श्रीरामनवमी उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू श्रीरामांचं संपूर्ण जीवन आपल्याला सत्य, न्याय आणि सद्गुणाच्या मार्गावर जाण्यासाठी मार्गदर्शन करतं, त्यांचं जीवन आपल्याला समाजाप्रति असलेल्या कर्तव्यांचं पालन करण्याची देखील प्रेरणा देत असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन तसंच लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमीनिमित्त देशभरातल्या राम मंदिरांमध्ये रामजन्म सोहळ्यासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अयोध्येत श्री राम मंदिरात आज

सकाळी रामलल्लांच्या मूर्तीला अभिषेक करून पूजा आणि आरती करण्यात आली. महाराष्ट्रातल्या विविध राममंदिरांमध्ये देखील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे.

श्रीराम नवमी

राम नवमी सणाच्या निमित्ताने नागपूर शहर प्रभू श्रीरामाच्या भक्तीत न्हाहून निघाल्याचं चित्र आहे. ठीक ठिकाणी उभारलेले फलक, कमानी , पताका, झेंडे, रोषणाई आणि रांगोळ्या यामुळे शहरभर चैतन्याचं वातावरण आहे .शहरातील ऐतिहासिक श्री पोद्दारेश्वर राम मंदिर आणि दक्षिण - पश्चिम नागपुरातील रामनगर इथल्या भव्य मिरवणुकांच्या स्वागतासाठी संपूर्ण शहर सजले आहे. थोड्या वेळा आधी संपन्न झालेल्या श्री पोद्दारेश्वर राम मंदिर येथील रथयात्रेच्या पूजनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच महापौर नीता ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शोभा यात्रेला प्रारंभ झाला असून निर्धारित मार्गावरून ही यात्रा मार्गस्थ होत आहे. यावर्षी दोन्ही मिरवणुकांमध्ये ८० हून अधिक चित्ररथांचा समावेश असून, हे चित्ररथ भारतीय संस्कृती आणि आधुनिकतेचा अनोखा संगम सादर करत आहेत. मिरवणुकीतील महिलांचा ‘बुलेट चित्ररथ’ हे यंदाचं प्रमुख आकर्षण आहे. विदर्भात ठिकठिकाणी राम नवमीचा उत्साह पाहायला मिळत आहे. ऐकुया हा विशेष वृत्तांत -

*राम नवमी निमित्ताने अकोल्यातील टिळक मार्गावरील पुरातन मोठ्या राम मंदिरात अलोट गर्दी उसळली. अकोला शहरात ठीकठिकाणी बारा वाजता राम जन्म सोहळा मोठ्या थाटात पार पाडला. याशिवाय अकोला शहरातील 35 जागृत राम मंदिरात दुपारी बारा वाजता श्री जानकी वल्लभ संस्थेच्या वतीने राम जन्म साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातील मुख्य मार्गांवरून भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. लहान मुलांनी प्रभू श्रीराम, लक्ष्मण आणि माता सीता यांची वेशभूषा करून रथातून आकर्षक देखावे सादर केले. रामनवमी निमित्त यवतमाळच्या जय हिंद चौक येथील प्राचीन राम मंदिरात किन्नर समाजाच्या वतीने पितळीची घंटा अर्पण करण्यात आली. शहरात सुख-समृद्धी नांदावी, सामाजिक सलोखा, शांती नांदावी यासाठी ही घंटा विधिवत पूजा करून मंदिरात लावण्यात आली. दरम्यान आज यवतमाळ शहरात पारंपारिक वेशभूषेत रामभक्तांनी मोटर सायकलने प्रभात फेरी काढली. वैष्णव हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते यात सहभागी झाले.बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथल्या श्री संत गजानन महाराज मंदिरात रामनवमी उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा झाला. दुपारी १२ वाजता प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव*

*सोहळा पार पडला.देशभरातून हजारो भाविक आणि शेकडो दिंड्या सहभागी झाल्या असून संस्थानच्या वतीने दिंड्यांना धार्मिक साहित्य आणि वाद्यांचं वितरण करण्यात आलं.गोंदिया शहरातील रामनगर इथे राहणाऱ्या प्रणव जागळे या तरुणाने काढलेली 6 फूट लांबीची हनुमानाची रांगोळी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.*
*आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी समृद्धी शेणमारे*

हर्षवर्धन सपकाळ

राज्यातील कथित अत्याचार आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हिडिओप्रकरणी सरकारने गंभीर दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अशोक खरात प्रकरण आणि रुपाली चाकणकर यांच्या संदर्भातील मुद्द्यांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित करत संबंधितांना पदांवरून दूर करण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी याबाबत भूमिका स्पष्ट करावी, असही त्यांनी म्हटल आहे.

मनोरंजन व जैवविविधता क्षेत्र

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य वन विभाग यांच्यात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 वरील जामठा क्लोव्हरलीफ इंटरचेंज येथील लीफ क्रमांक 1 परिसरात 'मनोरंजन आणि जैवविविधता क्षेत्र' विकसित करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार NHAI चे सीजीएम आणि प्रादेशिक अधिकारी राकेश प्रकाश सिंह आणि राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास राव यांच्या हस्ते करण्यात आला.या प्रकल्पांतर्गत सुमारे 10 हेक्टर क्षेत्र 2026-27 पर्यंत 'बर्ड पार्क' आणि 'एव्हियरी पार्क' म्हणून विकसित करण्यात येणार आहे. सुमारे 34 कोटी रुपयांचा हा प्रकल्प NHAI च्या 'ऑक्सिजन पार्क' उपक्रमाचा भाग असून पर्यावरणीय संवर्धनाला चालना मिळेल. या उद्यानात पक्ष्यांसाठी वॉक-थ्रू एव्हियरीज, पोपट आणि उष्णकटिबंधीय पक्ष्यांसाठी विशेष बंदिस्त व्यवस्था, तसेच स्थानिक वनस्पतींवर आधारित अधिवास विकसित केला जाणार आहे.

डॉ. जयसिंगराव पवार

महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं आज पहाटे निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर कोल्हापूरातील पंचगंगा स्मशानभूमी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारास खासदार शाहू छत्रपती,

जिल्हाधिकारी अमोल येडगे आदींसह मान्यवर आणि इतिहास प्रेमी उपस्थित होते. 'मराठ्यांचा इतिहास'हा डॉ. जयसिंगराव पवार यांच्या अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय. छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध या विषयांवर अभ्यास करताना जयसिंगराव पवार यांना अनेक नवीन साधने मिळाली. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य, त्यांची धोरणे समाजापर्यंत नेण्यासाठी त्यांनी आयुष्यभर काम केलं. 'पंचगंगा तिरी' या नावाने डॉ. जयसिंगराव पवार यांनी आत्मचरित्र लिहिलं आहे .

पारलिंगी हक्कांचे संरक्षण दुरुस्ती विधेयक

पारलिंगी हक्कांचे संरक्षण दुरुस्ती विधेयक, २०२६ मागे घेण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीनं केंद्र सरकारला केली आहे. हे विधेयक नुकतंच संसदेत मंजूर झालं होतं.

हवामान

नागपुरात आज ३७ पूर्णांक ६ इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये आज वादळ आणि हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान मागील २४ तासांत अकोला इथं ४० पूर्णांक ७ इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली.

********